# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पुर्वीचे पुणे विद्यापीठ)

## परिपत्रक क्र.२४० /२०२४

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्थामध्ये स्थानिक निवड समितीद्वारे नियुक्त करण्यात येणाऱ्या अध्यापकांचे निवड समिती अहवाल व शिक्षक मान्यतेचे प्रस्ताव शैक्षणिक विभाग मान्यता कक्षाकडे सादर करण्याबाबत या कार्यालयाचे परिपत्रक क्र. १३८/२०२४ नुसार सर्व संबंधितांना यापूर्वीच कळविण्यात आलेले आहे.

याबाबत कार्यालयाने दि. ११ जून, २०२४ रोजी परिपत्रक क्र. १३८/२०२४ प्रसिध्द करून विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्थामधील स्थानिक निवड समितीचे आयोजन करून शिक्षक मान्यतेचे प्रस्ताव ऑनलाईन पध्दतीने दि. ३० सप्टेंबर, २०२४ पर्यंत आणि त्यासंदर्भातील आवश्यक कागदपत्रे पुढील १० दिवसांत विद्यापीठाकडे सादर करण्याबाबत कळविण्यात आलेले आहे. तसेच परिपत्रक क्र. १८२/२०२३ अन्वये स्थानिक निवड समितीचे आयोजन ज्या दिवशी होईल त्याचा निवड समिती अहवाल ४८ तासात आणि ७२ तासात मूळ अहवालाची प्रत विद्यापीठाकडे सादर करण्याबाबत कळविलेले आहे. तसेच निवड करण्यात आलेल्या अध्यापकांची शैक्षणिक अर्हतेची कागदपत्रे, अनुभव प्रमाणपत्र, पूर्वीची मान्यता पत्रे व इतर आवश्यक कागदपत्रे ऑनलाईन पध्दतीने अपलोड करण्यात यावी व त्याची प्रिंटआऊट घेऊन सर्व कागदपत्रे मूळ निवड समिती अहवालासोबत सादर करण्याबाबतही यापूर्वीच कळविण्यात आलेले आहे.

अनेक महाविद्यालयांनी तदर्थ (Adhoc) नेमण्यात आलेल्या अध्यापकांचे शिक्षक मान्यता प्रस्ताव सादर करण्यास मुदत वाढवून देणेबाबतची विनंती केलेली आहे. या अनुषंगाने प्राप्त आदेशानुसार कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२४–२५ करिता निवड समिती/तासिका तत्वावर नेमण्यात आलेल्या अध्यापकांच्या शिक्षक मान्यतेचे प्रस्ताव Online पध्दतीने सादर करण्याची मुदत दि. १५ ऑक्टोबर, २०२४ पर्यंत व त्या संदर्भात आवश्यक कागदपत्रे शैक्षणिक विभाग मान्यता कक्षाकडे सादर करण्याची मुदत दि. २५ ऑक्टोबर, २०२४ पर्यंत वाढविण्यात येत आहे. यापुढे कोणतीही मुदतवाढ दिली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

30/9/2024

(स. द. डाकेकर)
उपकुलसचिव

जावक क्र. सीसीओ/ ४७६३
दिनांक – ३० सप्टेंबर, २०२४

प्रत :– मा. प्राचार्य/संचालक
सर्व संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था